महाराष्ट्र टाइम्स, २७ फेब्रुवारी २००८ (मुंबई)

# मराठी सुवर्णयुग आता दूर नाही!



**सुधाकर प्रभू**

जागतिक कीर्तीचे
बांधकामतज्ज्ञ, उद्योजक

जगाच्या पाठीवर मराठी माणूस एखाद्या क्षेत्रात उतरतो तेव्हा त्याच्याजवळ तीन महत्त्वाचे गुण असतात. उत्तम शिक्षण, पारदर्शी प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रमांची तयारी. आजवर या गुणांनी मराठी माणसाला प्रत्येक क्षेत्रात यश दिले आहे. आजच्या वेगवान विकासाच्या युगात तर या गुणांमुळे मराठी माणूस यशाची नवनवी शिखरे गाठल्याशिवाय राहणार नाही. आपली मराठी कुटुंबव्यवस्था ही आपली फार मोठी ताकद आहे. मराठी माणसाचे कुटुंबवत्सल असणे हे त्याच्या यशाला नेहेमीच उपकारक ठरले आहे. आज महाराष्ट्र, भारत आणि जगावर नजर टाकली तर सर्वच ठिकाणी उत्तम शिक्षण घेतलेले मराठी तरुण मोठी कर्तबगारी गाजवत आहेत. आमच्या कंपनीचे अबुधाबी, इराकसह जगभरात इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये जे जे प्रकल्प चालू आहेत, त्यात मराठी तरुणांचा मोलाचा सहभाग आहे.

भारतात महाराष्ट्राच्या विकासाचा वेग इतर राज्यांपेक्षा जास्त असण्यातही मराठी माणसाच्या गुणांचा मोठा वाटा आहे. महाराष्ट्रात आता इन्फ्रास्ट्रक्चरचा विकास वेगाने होतो आहे. तो पुरा झाला की मराठी माणसाच्या कर्तृत्वाला नवनवी क्षितिजे दिसू लागतील. अजून पाच वर्षांनी एक विकसित देश म्हणून भारत जगात तळपत असेल, असे इथे ब्रिटनमध्ये मानले जाते. भारताचे असे चित्र निर्माण होण्यात मराठी माणसाचे योगदान लक्षणीय आहे.

मला वाटते, आता मराठी तरुणांनी जगात हवे तिथे जावे, आपल्या कौशल्याच्या आधारावर नवनव्या संधी मिळवाव्यात आणि नंतर मायभूमीत परत यावे. महाराष्ट्रात पूर्वी कधीही नव्हत्या इतक्या संधी आता निर्माण होत आहेत. आमची पिढी शिकून बाहेर पडली तेव्हा इतक्या नव्या संधी नव्हत्या. १०-१२ वर्षांपूर्वी आम्ही नव्या आर्थिक उदारीकरणाच्या युगात भारत-महाराष्ट्रात अनेक प्रकल्पांच्या निमित्ताने आलो तेव्हा मराठी माणसांनी दिलेले सहकार्य पाहून मला कमालीचा आनंद झाला. महाराष्ट्रात नवी औद्योगिक संस्कृती रूजत असल्याची ती खूण होती. या मराठी (व इतरही) सहकाऱ्यांच्या बळावर आमची फ्रिशमन अँड प्रभू कंपनी विमानतळांपासून एसईझेडपर्यंत आणि रस्त्यांपासून मेट्रोरेलपर्यंत अनेक प्रकल्प राबवत आहे.

महाराष्ट्रातल्या शिक्षणपद्धतीबद्दल अनेक मते व्यक्त होतात. पण आपले शिक्षण खरोखरच उत्तम आहे. या शिक्षणाच्या बळावर जगभर मराठी तरुण नाव कमावू शकतात. याशिवाय, मराठी माणसावर आपण विश्वासाने काम सोपवू शकतो, तो ते काम पुरे करणारच, असा आत्मविश्वास जगातल्या उद्योजकांना वाटतो. जगात वावरताना मराठी माणसाने केवळ एकच दोष काढून टाकावा, असे मला वाटते. तो म्हणजे, बारीकसारीक गोष्टींची चिकित्सा करत त्याबाबत कलह करत राहायचे. मराठी माणूस कधीकधी एखाद्या छोट्या गोष्टीवर फार शक्ती खर्च करतो. त्याऐवजी मराठी तरुणांनी मुख्य ध्येयावर एक डोळा आणि त्यासाठी करावयाच्या प्रयत्नांवर दुसरा, अशी वाटचाल केली तर तो जगात अव्वल ठरेल!